Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# वर्णव्यवस्थाः देशापुढील एक आव्हान

**प्रा. जोगदंड आर.बी.**
इतिहास विभाग,
मत्स्योदरी कला महाविद्यालय,
तिर्थपुरी, जि. जालना

भारतीय हिंदू समाज वर्ण व्यवस्थेवर आधारित आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या चार वनात संबंध देशाच्या हिंदू समाजाची विभागणी झाली. एवढेच नाही तर या चार वर्णाच्या हजारो जाती आणि त्यांच्या हजारो पोट जाती निर्माण झाल्या. या व्यवस्थेमुळे ज्या जातीत आपला जन्म झाला त्याच जातीचे मनुस्मृतीने ठरवून देलेल्या आचार संहिता पालन करण्याचे बंधन असे. ब्राह्मणांनी अध्ययन, अध्यापन, धार्मिक कर्म कांडे आणि राजाला सल्ला देण्याचे काम करावे, क्षत्रियांनी राज्याचे संरक्षण करावे, वैश्यांनी शेती आणि व्यापार करावा आणि शुद्रांनी तिन्ही वर्णाचे म्हणजेच संपूर्ण हिंदू समाजाची सेवा करावी किवा हलक्या दर्जाची सर्व कामे शूद्रांना करावी लागत असत. मनुस्मृतीने  ठरवून दिलेली आचार संहिता पालन करण्याचे सर्व हिंदू समाजाला बंधन असे जो कोणी आचार संहितेचे पालन करत नसेल त्याला धर्म बहिष्काराला सामोरे जाण्याची शिक्षा देण्यात येत असे. अशा प्रकारच्या बहिष्काराच्या भीतीमुळे प्रत्येक जात आपल्याच जातीने ठरवून दिलेल्या नियमानुसार आचरण करीत असे.

वर्ण व्यवस्थेचा सगळ्यात वाईट परिणाम कोणता असेल तर या देशाचे स्वातंत्र्य कायमचे नष्ट झाले. भारत अनेक परकीय सत्तांच्या गुलामगिरीत गेला. संपूर्ण देशाची सामाजिक, धार्मिक,आर्थिक,राजकीय व्यवस्था विस्कळीत झाली. माणसामाणसात भेद निर्माण झाल्यामुळे रोटी-बेटी व्यवहार बंद झाले. आणि चौथा वर्ण असणारा शुद्र समाज तर मानवतेच्या सर्व हक्कांपासून कायमचा वंचित  ठेवण्यात आला. अशा प्रकारची हि वर्णव्यवस्था हिंदू समाजात प्रचलित होती आणि त्याला धार्मिक ग्रंथाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. मनुस्मृतीने “वर्णानाम ब्राम्हण्यगुरू” असे म्हणून ब्राह्मणांनी तिन्ही वर्णांचे आणि आपल्याच स्त्रियांचे शोषण केले, सोवळ्याओवळ्याचे नियम, कर्मकांडे, पूजा-अर्चा, अस्पृश्यता यांचे स्तौम निर्माण करून जातीयता पाळणे, उपवास तापास करणे, कर्मकांड करणे  आणि

आपापल्या जातीतच रोटी-बेटी व्यवहार पार पाडणे म्हणजेच धर्म अशा प्रकारची चुकीची संकल्पना निर्माण केली. आदर्श हिंदू तोच जो आपल्या जातीत आणि पोटजातीत सर्व व्यवहार पार पाडतो. हीच भावना समस्त हिंदू समाजात रुजविण्यात मनुस्मृतीने १०१% यशस्वी झाली. जो कोणी असा व्यवहार पार पाडणार नाही त्याला जातीतून बहिष्कृत केले जात होते.

वर्णव्यवस्था हि स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या आधुनिक लोकशाहीच्या मूल्यांच्या विरोधी आहे. तरी सुद्धा आपल्याच देशातील महान व्यक्तींनी ( समर्थ रामदास, स्वामी दयानंद सरस्वती, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी ) त्यांचे समर्थन केले आहे. या समर्थनार्थ महात्मा गांधी असे म्हणतात वर्णाश्रम धर्म या जगातील माणसांच्या जीवन ध्येयाची परिभाषा करतो. माणूस धन संपत्ती गोळा करण्याकरिता आणि उपजीविका करण्याकरिता वारंवार देह धारण करत नाही. आपल्या निर्मित्याला ओळखण्याकरिता आपल्या उर्जेचा एक-एक कण खर्च करण्याकरिता तो देह धारण करत असतो. त्यामुळे आपल्या जीवनधारणेकरिता त्याने आपल्या पूर्वजांच्या व्यवसायापर्यंत थांबले पाहिजे. हाच वर्णाश्रम धर्म आहे. ना यापेक्षा अधिक ना कमी (यंग २७.१०.१९२७ पृ.३५७).

वाडवडिलांच्या व्यवसायावर आधारित वर्णव्यवस्थेवर माझा विश्वास आहे. वर्ण चार आहेत आणि चार वैश्विक व्यवसायाशी टे जुळलेले आहेत. ज्ञानदान, संरक्षण, शेती आणि व्यापार आणि श्रमाद्वारे सेवा करणे हे ते चार व्यवसाय आहेत. टे चार व्यवसाय संपूर्ण मानव जातीतील समान रुपात अस्तित्वात आहेत. महात्मा गांधी यांनी आपल्या विचारात वर्ण व्यवस्था, जातीव्यवस्था यांचे समर्थनच केले नाही तर हि व्यवस्था कशी योग्य आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु आपल्या हे लक्षात येऊ शकते कि. जाती व्यवस्था व वर्ण व्यवस्थेचे समर्थन कारणाते हे विचार लोकशाही विरोधी, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांना पायदळी तुद्विणारे आहेत. हे निसंकोचपणे आपण सांगू शकतो.

अशा प्रकारची वर्णव्यवस्था निर्माण झाल्यामुळे क्षत्रिय सोडून इतर तीन वर्णाची इच्छा असूनही त्यांनी लढायचे नाही त्यामुळे आपोआपच आपला पराभव होत गेला आणि दुसरा सगळ्यात गंभीर परिणाम म्हणजे चौथा आणि शेवटचा वर्ण असणारा शुद्र समाज यांच्यावर मोठा आघात झाला. त्यांचे माणुसकीचे सगळेच अधिकार काढून घेण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात अस्पृश्यांना देवळात येऊ द्यायचे नाही. तसेच त्यांना स्वतःची देऊळेही बांधू द्यायचे नाहीत. हिंदू विहिरीवरून पाणी

घेऊ द्यायचे नाही आणि स्वतंत्र विहिरीही बांधू द्यायच्या नाहीत. शाळेत येऊ द्यायचे नाही व अस्पृश्याना स्वतंत्र शाळाही काढू द्यायच्या नाहीत. जर कोणी अस्पृश्यांना सवलती दिल्या तर घेऊ द्यायच्या नाहीत अस्पृश्यांना हिंदू म्हणायचे परंतु हिंदू स्मशानभूमीत प्रेताचे दहन व दफन करू द्यायचे नाहीत. हिंदू स्वतः दहन करतात म्हणून टे अस्पृशांना दहन करण्यासाठी प्रतिबंध करीत कारण खालच्या वर्णाने अनुकरणाने देखील सुसंस्कृत होऊ नये अशी मनुस्मृतीने निर्माण केलेली व्यवस्था होती.

**सारांश :-**

प्रचलित वर्णव्यवस्था देशापुढील एक मोठे आव्हान  होऊन बसलेले आहे. वर्णव्यवस्थेमुळे चार वर्णाच्या हजारो जाती आणि पोटजाती निर्माण झाल्या. त्याचा परिणाम एक जात दुसर्या जातीचा द्वेष करू लागली. माणसातील गुणवत्तेला प्राधान्य देण्याऐवजी जातीला प्रतिष्ठा देण्यात आली. जन्मावरून व्यक्तीचा दर्जा ठरविण्यात आला. त्यामुळे खालच्या वर्णातील व्यक्ती कितीही विद्वान असली तरी ती नालायकच ठरविण्यात आली. या व्यवस्थेमुळे माणसामाणसात भेद निर्माण केले. एवढेच नाही तर व्यवसायाचेही विभाजन करण्यात आले. कोणी कोणता व्यवसाय करावा याची निश्चिती वर्णव्यवस्थेने आखून दिली. त्यामुळे देशाचे फार मोठे नुकसान झाले.

**संदर्भ ग्रंथ:-**

१. महात्मा गांधीजींचे विचार - संपादक आर.के.प्रभू आणि युवा राव

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ - म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

३. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ - संपादक हरी नरके

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार दर्शन - प्रा. नागोराव कुंभार